# भारताची राज्यघटना

ज्योती प्रकाश बनसोडे संशोधक विदयार्थिनी,राज्यशास्त्र अधिविभाग,शिवाजी विदयापीठ, कोल्हापूर

---

**प्रस्तावना :-**

प्रत्येक देशाची राज्यघटना ही त्याय देशाच्या इतिहासाची निर्मिती असते. कोणत्याही देशातील विशिष्ट प्रकारच्या ऐतिहासिक परिस्थितीतूनच त्या देशाची राज्यघटना तयार होत असते. प्रत्येक देशाचा अंतर्गत कारभार सुरळीतपणे चालू राहण्यासाठी काही तत्वे व नियम आवश्यक असतात. या तत्वांना व नियमांना एकत्रितपणे राज्यघटना या नावाने संबोधले जाते. राज्यघटना तयार करणे म्हणजे तिची तत्वे व नियम शब्दबद्ध करण्याचे कार्य घटना समितीद्वारे पार पाडले जात असले तरी घटना समितीला आपल्या देशाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, राजकीय वारसा आणि सांस्कृतिक परंपरा इत्यादी गोष्टी विचारात घेवूनच राज्यघटना तयार करावी लागते. थोडक्यात सांगायचे तर राज्यघटना म्हणजे त्या देशाचा सर्वोच्च् कायदाच होय. पंडित नेहरू, सरदार पटेल, डॉ. राजेंद्रप्रसाद मौलाना अब्दुल कलाम आझाद, डॉ. श्यामप्रसाद मुखर्जी यासारखे मान्य्वर होते. तसेच डॉ. आंबेडकर, सर अलादी कृष्ण् स्वामी अय्य्र, डॉ. जयकर यासारखे विद्वान घटना समितीवर होते. ऑगस्ट 1947 मध्ये घटना समितीने कायदेपंडित डॉ. आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली घटना तयार करण्याकरिता एक मसुदा समिती नेमली. 26 नोव्हेंबर 1949 रोजी घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी त्या घटनेवर स्वाक्षरी करुन घटना संमत झाल्याचे जाहीर केले. 26 जानेवारी 1950 रोजी ती घटना लागू करण्यात आली. तेव्हापासून 26 जानेवारी हा ‘प्रजासत्ताक दिन’ म्हणून भारतात साजरा करण्यात येतो.

**भारतीय राज्यघटनेची वैशिष्टये**

**1) प्रदीर्घ लिखित घटना :-**

भारताची राज्यघटना ही 395 कलमांची व 8 परिशिष्टांची एक लिखित घटना आहे. तसेच केंद्र व राज्यसरकारचे स्वरूप, मुलभूत अधिकार मार्गदर्शक तत्वे, न्यायपालिका, संघ व घटकराज्याच्या अधिकारांची विभागणी, निर्वाचन आयोग इ. सर्व बाबींचा तपशील घटनेत दिलेला असल्याने भारताची राज्यघटना ही लांबलचक बनली आहे.

**2) निरनिराळया देशांच्या राज्यघटनांतून भारताच्या हिताच्या दृष्टीने स्वीकृत केलेली वैशिष्टये :-**

भारताच्या राज्यघटनेच्या स्वरूपाचा विचार करताना जगातील प्रमुख राष्ट्रांच्या राज्यघटना घटनाकारांच्या दृष्टीसमोर होत्या. अमेरिकेच्या अध्यक्षाप्रमाणे भारताचा राष्ट्रपती हा राष्ट्रप्रमुख असला तरी तो अमेरिकेच्या अध्यक्षासारखा शासनप्रमुख नाही. तर इंग्लंडच्या राजाप्रमाणे तो नामधारी राष्ट्रप्रमुख असून राष्ट्राच्या ऐक्याचे व प्रतिष्ठेचे तो प्रतीक आहे.

**3) सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताक राष्ट्र :-**

भारताच्या घटनेनुसार भारत हे सार्वभौम कोणत्याही अंतर्गत किंवा बाहय वर्चस्वापासून पूर्णपणे मुक्त् असलेले राष्ट्र आहे. खरी सत्ता जनतेच्या हाती आहे. कारण राष्ट्राच्या सर्वोच्च् पदाधिका-याची निवडही निर्वाचनाद्वारा होते. घटनेने समाजवादाचा आदर्श स्वीकारला आहे.

भारतीय राज्य् धर्माधिष्ठीत नाही, तर ते धर्मनिरपेक्ष आहे. सरकारला सर्व धर्म सारखेच राहतील प्रत्येक नागरिकाला स्वतःच्या इच्छेनुसार कोणत्याही धर्माचा स्वीकार करता येईल.

**4) संसदीय लोकशाही सार्वत्रिक प्रौढ मताधिकार :-**

स्वातंत्र्यसंग्रामाच्या काळात भारतीय नेते प्रातिनिधीक लोकशाहीची मागणी करीत होते. त्याबाबत इंग्लंडचा आदर्श त्यांच्यासमोर होता. त्या दृष्टीने घटनेद्वारा भारताने संसदीय लोकशाही पध्दतीचा स्वीकार केला. भारतामध्ये संसदेत बहुमत प्राप्त् झालेला पक्षच मंत्रिमंडळ बनवू शकतो व ते कार्यकारी मंडळ संसदेला म्हणजेच लोकप्रतिनिधींना जबाबदार असते. खरी सत्ता लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या हाती असते. लोकप्रतिनिधीची निवड सार्वत्रिक प्रौढ मताधिकार व गुप्त् मतदान पध्दतीने होते.

**5) घटनेचे संघात्मक स्वरूप एककेंद्रात्मक घडण :-**

भारतीय राज्यघटनेचे स्वरूप संघात्मक असले तरी मुळ गाभा मात्र एककेंद्रात्मक आहे. भारताच्या तत्कालीन परिस्थितीचा परिणाम घटनाकारांवर होणे स्वाभाविकच होते. लोकशाहीतील व्यक्ती स्वातंत्र्याबरोबरच राष्ट्रसंरक्षणाच्या प्रश्नाला सर्वाधिक महत्व् आले. त्यामुळे राष्ट्रीय ऐक्य् व शक्तिशाली केंद्र सरकार यावर भर देण्यात आला.

**6) मुलभूत अधिकार :-**

लोकशाहीचा एक प्रमुख निकष म्हणजे नागरिकांचे मुलभूत अधिकार भारतीय राज्यघटनेत नागरिकांच्या मुलभूत अधिकारांवर विशेष भर देण्यात आला आहे. नागरिकांच्या या मुलभूत अधिकारांना दिलेली मान्यता म्हणजे लोकशाहीतील जनकल्याणाची हमी मानली जाते.

**7) मार्गदर्शक तत्वे :-**

देशाचे शासन जास्तीत जास्त् कल्याणकारी स्वरूपाचे असावे या हेतूने काही मार्गदर्शक तत्वे घटनेत नमूद करण्यात आली आहेत. शासनाच्या दृष्टीने ही तत्वे नीतिनिर्देशक असतात. अर्थात मुलभूत अधिकारांना जसा कायद्याचा पाठिंबा आहे तसा मार्गदर्शक तत्वांना नाही.

**8) एकेरी नागरिकत्व् :-**

अमेरिकेत नागरिकाला संघराज्याचे व घटक राज्याचे असे दुहेरी नागरिकत्व् मिळते. तसे ते भारतात मिळत नाही. भारतात प्रत्येक व्यक्तीला फक्त् एकच, संघराज्याचे नागरिकत्व् मिळते. एकात्म् राज्य् व्यवस्थेला ही व्यवस्था साहजिकच पोषक ठरणारी आहे.

**9) स्वतंत्र न्यायपालिका :-**

संघराज्याच्या निर्मितीबरोबर स्वतंत्र व एकेरी न्यायपालिकेची स्थापना करणे आवश्यक ठरले. जिल्हा स्तरांवर दुय्यम न्यायालये, त्यांनतर प्रत्येक राज्यात उच्च् न्यायालय व सर्वात वरच्या स्तरावर सवोच्च् न्यायालय अशी रचना आहे. न्यायाधीशांची नियुक्ती करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला असला तरी लहरीनुसार त्याला बडतर्फ करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाना देण्यात आलेला नाही. त्याकरिता विशिष्ट पध्दती घालून देण्यात आली आहे.

**10) अल्पसंख्याक व दलित वर्ग यांना संरक्षण :-**

भारतात निरनिराळया जातीचे धर्माचे व वंशाचे लोक राहतात. त्यांच्या संरक्षणाची तरतूद घटनेद्वारा केली जावी अशी मागणी होती. समाजातील कोणत्याही गटाला जास्तीच्या सवलती देणे हे लोकशाही तत्वांना धरून नसले तरी भारताची विशिष्ट परिस्थिती लक्षात घेता, अल्पसंख्याक व दलित वर्ग यांच्यावर अन्याय होवू नये, या दृष्टीने त्यांना संरक्षण दिले जाते हे घटनाकारांना अगत्याचे वाटले. त्यामुळे तत्संबंधी व्यवस्था घटनेत करण्यात आली आहे. अल्पसंख्याकांना खास संरक्षण देणारी भारतीय घटना ही त्या प्रकारची जगातील बहुधा एकमेव घटना असावी.

**11) काही प्रमाणात लवचिक तर काही प्रमाणात ताठर घटना :-**

घटना दुरूस्ती कोणतीही घटना जशीच्या तशी कोणत्याही प्रकारचे बदल न होता दीर्घकाळपर्यंत चालू राहील हे अशक्य्च आहे. राष्ट्राची उद्दिष्ट्ये व आशा आकांक्षा यांचा अविष्कार घटनेद्वारा होत असतो. भारताची घटना इंग्लंडसारखी लवचिक नसली तरी परिवर्तनशील बनली आहे. मात्र बदल करावयाचे ते घिसाडघाईने, उतावळेपणाने किंवा अविचाराने केले जावू नयेत, ते पूर्ण विचारांती व्हावे याची काळजी घटनाकारांनी घेतली आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहात एकूण सदस्यांच्या बहुमताने व उपस्थित सदस्यांच्या दोन तृतियांश मताने दुरूस्तीबाबतचा ठराव समंत व्हावा लागतो. काही महत्वांच्या मुद्द्यांवरील दुरूस्तीला दोन्ही सभागृहांकडूनवर निर्देश केलेल्या पध्दतीने संमती मिळाल्यानंतर कमीत कमी अर्ध्या घटकराज्यांची संमती अनिवार्य मानली गेली आहे.

**भारतीय राज्यघटनेचे महत्व्**

ब्रिटीश राजवट आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळ यांच्यातील आंतरक्रियेतून भारतीय राज्यघटनेच्या चौकटीची रूपरेषा तयार झाली. जवळजवळ तीन वर्षे अविश्रांत परिश्रम घेवून घटनाकारांनी राज्यघटना तयार केली. 26 नोव्हेंबर 1949 रोजी घटना समितीने राज्यघटनेच्या मसुद्याला अंतिम मान्यता दिली आणि 26 जानेवारी 1950 पासून भारतीय राज्यघटनेची प्रत्यक्षात अंमलबजावणी सुरू झाली भारताची राज्यघटना लिखित, विस्तृत, व्यापक आणि सर्वसमावेशक अशी आहे.

भारतीय राज्यघटना ही लिखित असून राज्यघटनेत शासनाच्या तिन्ही अंगांची रचना अधिकारांबाबत, संघराज्याचे स्वरूप नागरिकत्व् व मुलभूत हक्क् इत्यादी बाबींचा स्पष्टपणे नियमावली तयार केली आहे. भारतात आजपर्यंत 97 वेळा राज्यघटनेत दुरूस्त्या केल्या आहेत. जगातील विविध देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करून व भारतीय परिस्थितीचा सर्वांगीण विचार करून घटना तयार करण्यात आली. घटनेत जनतेच्या अनेक मुलभूत हक्कांचा, अधिकारांचा समावेश करण्यात आला आहे. साध्या, सरळ, सोप्या भाषेत भारतीय राज्यघटना असल्याने ती सर्व सामान्यांनाही सहज समजू शकते. राज्यकारभारातील सर्व अधिकार जनतेच्या हाती दिल्याने जनतेचे सर्वच् क्षेत्रांत सर्वश्रेष्ठत्व् निर्माण झाले. राज्यघटनेच्या अभावी देशात अराजकता निर्माण होत असते. जगातील अनेक चांगल्या बाबींचा समावेश भारतीय राज्यघटनेत दिसून येतो. भारतीय राज्यघटना निसंदिग्ध् करण्याचा पुरेपूर प्रयत्न् घटनाकारांनी केल्याचा दिसतो. राज्यघटनांमध्ये भारताला धर्मातील राज्य् बनविले आहे.

राज्यघटनेने सर्व धर्मांना समान लेखले असून प्रत्येक नागरिकाला त्याच्या धर्मानुसार आचरण करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. घटनेमध्ये आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांना तसेच अनुसूचित जाती-जमातींना अनेक सवलती देवून सामाजिक न्यायाची प्रस्थापना केल्याचे दिसते.

भारतीय राज्यघटनेनुसार घटनेचे सर्वश्रेष्ठत्व् मान्य् करण्यात आले आहे. त्यामुळे कायदेमंडळाचे केलेला कायदा घटनाबाहय असल्यास तो रद्द ठरविण्याचा अधिकार न्यायालयाला दिलेला आहे. जनतेच्या मुलभूत अधिकारांवर गदा आल्यास जनतेला न्यायालयाकडे दाद मागता येते. थोडक्यात भारतातील विषमता नष्ट व्हावी. जनतेचा सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टीने भारतीय राज्यघटना तयार करण्यात आली. अशी व्यापक उद्देशाने तयार करण्यात आलेली राज्यघटना ही जगात आदर्श राज्यघटना म्हणून ओळखली जाते. ही राज्यघटना आदर्श करण्याचा प्रयत्न घटनाकार आपल्या प्रयत्नांत बहुतांशी यशस्वी झाले आहेत.

**संदर्भसूची**

1) प्रा.डॉ.गव्हणे किशोरकुमार, प्रा.डॉ.शिंदे सुखदेव, प्रा.डॉ. कुलकर्णी जयश्री रमेश, भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास, (इ.स. 1918 ते इ.स.1950), जून 2015

2) डॉ.कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास (1947 - 2000), 2013, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.

3) प्रा. घांगरेकर चिं.ग, भारतीय राज्यघटना स्वरूप व राजकारण (2011), श्री मंगेश प्रकाशन

4) ऑस्टिन ग्रॅनव्हिल, भारतीय राज्यघटना (राष्ट्राची कोनशीला), (2013), डायमंड पब्लिकेशन

5) प्रा. खंडागळे चंद्रकांत, भारतीय राज्यघटना आणि राजकीय व्यवस्था, (2019) प्रकाशक, अक्षर दालन

6) पाटील बी.बी, भारतीय शासन आणि राजकारण, (2006), फडके प्रकाशन

7) प्रा. पाटील व्ही.बी, भारतीय राज्यव्यवस्था (महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह), (2008) के सागर पब्लिकेशन्स्

8) बेडकीहाळे किशोर, बाळ प्रकाश, भारतीय राजकीय व्यवस्था, (प्रक्रिया आणि स्वरूप), (2002) प्रकाशक, आंबेडकर अकादमी सातारा.